# भूमिका

'आप्पासाहेब खोत यांचे कथा वाङ्मय' ('रानगंगा' आणि 'कळवंड–या कथा संग्रहाच्या अनुषंगाने ') हा विषय एम्. फिल्. च्या प्रबंधिकेसाठी निवडण्यात आला तो मार्गदर्शक डॉ. सुमन पाटील मॅडम यांच्याशी सल्लामसलत करूनच.

बी.ए. भाग –३ मधील आठ नंबरचा पेपर आभ्यासताना ग्रामीण साहित्याची ओळख झाली आणि ग्रामीण साहित्त्याच थोड्याफार प्रमाणात वाचन होऊ लागल्याने त्यामध्ये रस वाटू लागला अनुभती आणि अविष्कार संपन्न ग्रामीण कथा ही मनाला स्पर्श करून गेली. मी खेड्यातील असल्याने माझ्या गावचे प्रतिबिंब मला साहित्यात आढळले. शिवाय आप्पासाहेब खोत यांची 'गवनेर' ही कथा मी ऐकली होती. म्हणूनच मला वाटले की आपण ही ग्रामीण कथेचा आभ्यास करण्यासाठी खोतांची कथा निवडावी. त्यांच्या कथा या माणूस आणि माती, बदलत्या ग्रामीण माणसाच्या व्यथा, वेदना परिणामारकरित्या मांडणाऱ्या अशाच आहेत. त्यांच्या कथेतील आशय आणि अविष्कार वेगळाच वाटला. म्हणूनच लेखक आप्पासाहेब खोत यांच्या कथालेखनाचे सामर्थ्य काय आहे. यासंबंधी काही विचार मांडावा ही माझी या संशोधनामागील भूमिका आहे.

'रानगंगा ' आणि 'कळवंड' या दोन कथासंग्रहाच्या अनुषंगाने ग्रामीण जीवनाच्या बदलत्या वृत्ती – प्रवृत्ती, व्यथा, वेदना निर्माण होणारा ताणतणाव तसेच प्राणीमात्रांवर असणार त्यांच जीवापाड प्रेम माणूसकी हरवत चाललेली माणसे त्यांचे अंतरंग समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधनाच्या भूमिकेतूनच व ग्रामीण जीवन व त्यांच्या लेखनातील विशेष समजून घेण्यासाठी हे कथासंग्रह निव डल्यामुळे आनंद झाला. मार्गदर्शकांनी ही उत्तम मार्गदर्शनाने तो सजविला अभ्यासा विषयीची निवड करण्यापासुन ते प्रबंधिकेला पूर्णत्व प्राप्त करून देण्यापर्यंत माझे मार्गदर्शक आदरणीय गुरूवर्य डॉ. सुमन पाटील व मराठी विभाग प्रमुख स. गा. म कॉलेज, कराड यांनी जे बहुमोल मार्गदर्शन केले, प्रबंधिकापूर्तते साठी प्रेरणा दिली

म्हणून त्यांचे आभार मानायचे माझे आद्य कर्तव्य आहे. लेखक श्री. आप्पासाहेब खोत व सौ. लतादेवी काकी  त्यांची कन्या संध्याताई यांच्या बहुमुल्यसहकार्यामुळेच मी ही प्रबंधिका पूर्णत्वास नेऊ शकले. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच!

ही प्रबंधिका पूर्णत्वास नेताना सतत प्रेरणा देणाऱ्या सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. सौ. रेश्मा दिवेकर, प्रा. सौ. निकम, प्रा. सौ. रैनाक, प्रा. डॉ. रवींद्र पाटील सर, मराठी विभागप्रमुख प्रा. संभाजीराव देसाई, ब्रह्मदास विद्यालय बेलवडे बु।। चे आर. के. माळी सर , ए. आर. पाटील  सर सतत आशिर्वाद व मायेचे ममत्व देणारे माझे पापा श्री. एल. जी. मोहिते सर, प्रा. डॉ. किरवले या सर्वांची मी आभारी आहे.

प्रबंधिकेसाठी आवश्यक अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी स. गा. म. कॉलेज, कराड ग्रंथालय, समाजभूषण बाबुराव गोखले सार्वजनिक ग्रंथालय सैदापूर, ब्रह्मदास विद्यालय, बेलवडे बु.।। ग्रंथालय व ग्रंथपाल, स.गा. म. कॉलेजचे ग्रंथपाल पोरेंसर आणि त्यांचे सहकारी यांचेही आभार. प्रबंधिकेची छपाई करते वेळी पूर्ण करून देणारे दत्तप्रसाद एन्टरप्राईझेस चे श्री. फुलंब्रीकर यांचेही आभार मानते.